जे.के.फर्निशींग
•सोफा कापड •फोम गादी •सोफा गादी
•पीव्हीसी कार्पेट •कुशन •लोड •पडदे
Sleepwell
जयस्तंभ चौक, अमरावती, मो. ९८९५०९३३४, ९१४६०९९११६

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३३ ■ सोमवार, दि.२ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

होली की पिचकारी
होली कलर, पिचकारी, गुलाल, फायरोपॉक, फॉक, एअर बलून गन, बलुन, फॅन्सी मास्क, टैग में वैराइटी गुलालगंज इलेक्ट्रॉनिक गण, इलेक्ट्रॉनिक टॅग, गुलाल, गुलाल सिलेंडर, हेअर माक्स/ब्लॅक हेअर ,मलींगा कॅप, टी शर्ट, टॅक मे व्हेरायटी, क्रिकेटर
होलसेल भाव में चिल्लर उपलब्ध.
दीपक ट्रेडिंग कंपनी
शॉप नं. ६८, जी.एम.डी. मार्केट, राम नगर, अकोला.

## इराणचा सौदीच्या ‘अरामको’ रिफायनरीवर हल्ला
## जगातल्या सर्वात मोठ्या तेल कंपनीचे उत्पादन बंद

वृत्तसंस्था २मार्च

**तेल अवीव/तेहरान:** आज इस्त्रायल-अमेरिका-इराण युद्धाचा तिसरा दिवस आहे. दरम्यान, इराणने सौदी अरेबियातील सर्वात मोठ्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर, रास तनुरा वर हल्ला केला आहे. हा शुद्धीकरण प्रकल्प सौदी सरकारी मालकीच्या तेल कंपनी सौदी अरामकोचा आहे. रॉयटर्सच्या मते, हल्ल्यानंतर शुद्धीकरण प्रकल्प बंद करण्यात आला आहे.त्याची क्षमता दररोज सुमारे ५.५ ते ६ लाख बॅरल असण्याचा अंदाज आहे. तेल निर्यात टर्मिनल रास तनुरा हे जगातील सर्वात मोठ्या ऑफशोअर ऑइल लोडिंग टर्मिनलपैकी एक आहे. येथून, कच्चे तेल मोठ्या तेल टँकरमध्ये भरले जाते आणि अमेरिका, आशिया आणि युरोपसह अनेक देशांमध्ये पाठवले जाते.

दरम्यान, इराणचे सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा अधिकारी अली लारीजानी यांनी सोमवारी सांगितले की, इराण अमेरिकेशी कोणतीही चर्चा करणार नाही. इराणने अमेरिकेशी पुन्हा चर्चा सुरू करण्याचा प्रयत्न केल्याच्या वृत्ताला उत्तर म्हणून हे विधान आले आहे.इराणने आज पुन्हा हल्ले सुरू केले आहेत, ज्यात इस्त्रायल, कतार, बहरीन आणि संयुक्त अरब अमिराती यांना लक्ष्य केले आहे. दरम्यान, लेबनीज दहशतवादी गट हिजबुल्लाह देखील या संघर्षात सामील झाला आहे. त्यांनी इस्त्रायलमधील अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट केले आहेत. इराणकडून पाठिंबा मिळवणाऱ्या हिजबुल्लाहने आता म्हटले आहे की ते खामेनीच्या मृत्यूचा बदला घेत आहेत.

अल-जझीराच्या अहवालानुसार, अमेरिका आणि इस्त्रायलने एकत्र येऊन आतापर्यंत इराणच्या १००० हून अधिक ठिकाणांवर हल्ले केले आहेत. या दरम्यान, सुरुवातीच्या ३० तासांत २००० हून अधिक बॉम्ब टाकण्यात आले.यामध्ये आतापर्यंत २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ७४० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. एका शाळेवर क्षेपणास्त्र पडल्याने १८० विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ४५ जखमी झाल्या आहेत. २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेल्या या लढाईच्या पहिल्या दिवशी झालेल्या बॉम्ब हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई मारले गेले होते.

ब्रिटन मध्य पूर्वेतून आपल्या नागरिकांना बाहेर काढण्याची तयारी करत आहे. ब्रिटनच्या परराष्ट्र मंत्री यवेट कूपर यांनी सांगितले की, या प्रदेशात सुमारे ३ लाख लोक असल्याची माहिती आहे. सरकार विविध पद्धतींवर काम करत आहे. गरज पडल्यास, सरकार स्वतःच स्थलांतर करेल. ब्रिटन प्रवासी कंपन्यांसोबत काम करत आहे आणि लोक सुरक्षितपणे घरी परतू शकतील यासाठी हवाई वाहतूक लवकरात लवकर पुन्हा सुरू करावी अशी त्यांची इच्छा आहे.




### इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनी बंद

जगातील सर्वात महत्त्वाचा सागरी मार्ग मानला जाणारा होर्मुझ सामुद्रधुनीबद्दलही चिंता कायम असून बाजारात पुरवठा राखण्यासाठी आणि किमतीतील अत्यधिक चढउतार नियंत्रित करण्यासाठी ओपेक प्लस देशांनी एप्रिलपासून तेल उत्पादन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काळात मध्य पूर्वेतील परिस्थितीवर तेल बाजार मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल असे तज्ज्ञांचे मत आहे.

### इस्त्रायल आणि अमेरिकेने इराकमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केले

इस्त्रायल आणि अमेरिकेने इराकची राजधानी बगदादमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, क्षेपणास्त्रांनी जुर्फ अल-सखार परिसरातील इराण समर्थक दहशतवादी गट हिजबुल्लाहच्या ठिकाणांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमध्ये अनेक इमारती, वाहने आणि गोदामांचे मोठे नुकसान झाले आणि आग लागली. तथापि, अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याचे वृत्त नाही. मध्य पूर्वेत वाढत्या तणावामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाजांना धोका वाढला आहे. ओमानजवळ ‘स्काय लाईट’ नावाच्या तेल टँकरवर हल्ला करण्यात आला. जागतिक तेल पुरवठ्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. वाढत्या धोक्यामुळे, जर्मन शिपिंग कंपनी हापाग-लॉयडने या मार्गावरून आपल्या जहाजांची वाहतूक थांबवली आहे.

### इराण-इस्त्रायल युद्धामुळे ३,००० उड्डाणे रद्द

इराणवरील अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यांमुळे जगभरातील हवाई प्रवासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. सोमवारीही शेकडो उड्डाणे रद्द करण्यात आली, ज्यामुळे लाखो प्रवासी विविध देशांमध्ये अडकून पडले. अहवालांनुसार, विमान कंपन्यांचे शेअरही घसरले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी असे संकेत दिले आहेत की अमेरिकेची लष्करी कारवाई चार ते पाच आठवडे टिकू शकते, ज्यामुळे हवाई प्रवासात आणखी अनिश्चितता वाढू शकते. मध्य पूर्वेतील अनेक प्रमुख विमानतळ बंद आहेत. जगातील सर्वात व्यस्त आंतरराष्ट्रीय विमानतळ मानले जाणारे दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सलग तिसऱ्या दिवशीही बंद राहिले. कोविड-१९ साथीच्या आजारानंतरची ही सर्वात मोठी हवाई संकटाची परिस्थिती मानली जात आहे.

## माजी महापौर विजय अग्रवाल
## तिसऱ्यांदा झाले स्थायी समिती सभापती







प्रतिनिधी २मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेमध्ये विविध समित्यांच्या सभापती पदासाठी आज निवडणुक झाली. शहर सुधार आघाडीचा विजय विविध समित्यांवर होता. स्थायी समिती सभापती पदावर माजी महापौर विजय अग्रवाल तिसऱ्यांदा सभापती म्हणून विराजमान झाले. त्यांनी केंद्र व राज्याच्या मदतीने अकोल्याचा विकास करण्याची ग्वाही यावेळी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना दिली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा मिना, आयुक्त डॉ.सुनील लहाने, नगर सचिव इतर उपायुक्त उपस्थित होते. यावेळी आ.रणधिर सावरकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या उपस्थिती पदग्रहण झाले.

अकोल्याच्या राजकारणातील धुरंधर म्हणून सुपरिचित आणि अकोला महापालिकेत भाजपची सत्ता स्थापन करण्यात महत्वाचा केंद्र बिंदू असलेले विजय अग्रवाल पुन्हा एकदा स्थायी समिती सभापती म्हणून विराजमान झाले. माजी महापौर असलेले विजय अग्रवाल हे तिसऱ्यांदा स्थायी समिती सभापती झाले आहे. शहर सुधार आघाडीच्या वतीने आज विजय अग्रवाल यांनी अर्ज दाखल केला होता. शहर सुधार आघाडीचे ९ सदस्यांनी विजय अग्रवाल यांना मतदान केले. काँग्रेस उमेदवाराला मिळाले केवळ सहा मते, एम आय एम चे एक सदस्य तठस्थ राहीला. काँग्रेस उमेदवाराला काँग्रेसचे चार तर वंचित आणि शिवसेनाचा प्रत्येकी एक नगरसेवकांचे मतदान केले. काँग्रेस उमेदवार शेख फरिद झाले स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीत पराभुत झाले. भाजप नेते विजय अग्रवाल यांच्या विजयाचा महापालिकेत जल्लोष, फटाके फोडून आनंद व्यक्त केला. तर एम आय एम चे एक सदस्य तठस्थ राहील्याची माहिती आहे.यावेळी आ.रणधिर सावरकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या उपस्थिती पदग्रहण झाले. गटनेता पवन महल्ले, महापौर शारदा खेडकर यांच्या प्रमुख उपस्थित विजय अग्रवाल यांनी स्थायी समिती सभापती पदग्रहण केले. यावेळी भाजप व शहर सुधार आघाडीच्या नगरसेवक, नगरसेविका, मनपा व इतर अधिकाऱ्यांनी विजय अग्रवाल यांचे अभिनंदन केले. तर आज झालेल्या दूसऱ्या निवड प्रक्रियेत महिला व बाल कल्याण सभापती पदी आरती घोगलेया, पुर्व झोन सभापती पदी रश्मी अवचार, पश्चिम झोन सभापती पदासाठी राजेश्वर धोटे, काँग्रेस च्या जैनब बी शेख इब्राहिम यांनी उत्तर झोन सभापती पदावर नियुक्त करण्यात आले आहे. दक्षिण झोन सभापतीपदावर पुजा गावंडे यांची निवड झाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

**सुचना**

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. ३ मार्च २०२६ रोजी धुलीवंदन दिनानिमित्तदै. सिटीन्यूज सुपरफास्ट कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे दि.३ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

- वितरण व्यवस्थापक

CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या
३ सोप्या किस्ती ११ महिने
मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र
मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)
-:संपर्क:-
सिध्दार्थ दामोधरे अमरावती
मो.9545000880

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

## भाजप करणार या चौघांना स्विकृत नगरसेवक!

प्रतिनिधी २मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेत आठ स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे. या नियुत्त्या ९ मार्च रोजी जाहीर होणार असल्याने राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता लागली आहे. या नियुत्त्यांसाठी प्रशासनाने अत्यंत कडक आणि स्पष्ट पात्रता निकष जाहीर केले असून, यामुळे निवडीमध्ये पारदर्शकता राखली जाण्याची शक्यता आहे. आता ही नियुक्ती पाच वर्षासाठी होते की अडीच हे देखील पाहण्यासारखे असेल. एकीकडे ’शहर सुधार आघाडी’ने आपल्या स्वीकृत सदस्यांसाठी ॲड.देवाशीष काकड, ॲड. गिरीश गोखले, चंदा शर्मा आणि सुनील मेश्राम यांची नावे निश्चित केल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, काँग्रेस पक्षाकडून अद्याप नावांची अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, मागील निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांना या पदाद्वारे ’बॅकडोअर एंट्री’ मिळते का, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे. या पदासाठी पक्षांतर्गत आणि बाहेरील तज्ज्ञांची निवड कशी केली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### काय आहेत पात्रता निकष?

स्वीकृत सदस्य पदासाठी उमेदवाराकडे संबंधित क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असणे अनिवार्य आहे. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार मान्यताप्राप्त आणि नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता किंवा मुख्याध्यापक, सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल,मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी,कायद्याची पदवी आणि विधी क्षेत्रातील अनुभव, नगरपरिषद मुख्य अधिकारी, मनपा सहाय्यक आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून अनुभव, किंवा मनपातून सेवानिवृत्त आयुक्त तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत सामाजिक संस्थेचे पदाधिकारी यांची नियुक्ती करता येईल. ९ मार्च रोजी होणाऱ्या घोषणेकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, खऱ्या अर्थाने ’तज्ज्ञ’ व्यक्तींना संधी मिळते की राजकीय पुनर्वसनासाठी या पदाचा वापर होतो, हे लवकरच स्पष्ट होईल.

## ‘व्हीएसआर’चे मालक रोहित सिंह यांना अटक करा!

प्रतिनिधी २मार्च

**पुणे :** व्हीएसआर कंपनीचे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर विमान उड्डाणादरम्यान झोपलेले दिसत आहेत, या निष्काळजी प्रकरणी त्यांना अटक करा, असे लिहित दिवंगत नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे सुपुत्र जय पवार यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. माझ्या वडिलांना आपण गमावलंच, आता एका मुलाची आर्त हाक आहे, असं सांगत जय पवार यांनी डीजीसीएकडे कारवाईची मागणी केली आहे. हा व्हिडिओ नेमका कधीचा आहे, हे जय पवार यांनी स्पष्ट केलेलं नाही. मी डीजीसीएला ठामपणे मागणी करतो, की या प्रकरणात तात्काळ कठोर कारवाई व्हावी.

## दोन सख्ख्या भावांसह तीन मित्रांवर काळाचा घाला!

### आयशरने तिघांनाही चिरडले; माळेगावात पेटली नाही चूल, शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार





प्रतिनिधी २मार्च

**तेल्हारा :** तालुक्यातील माळेगाव बाजार येथील ग्रामस्थांवर रविवारची दुपार दु:खाचा डोंगर कोसळून गेली. तीन जीवाभावाचे मित्र त्यातील दोन सख्खे भाऊ या तिघांनाही तेल्हारा ते माळेगाव बाजार रस्त्यावरील शेरी फाट्यानजिक आयशर ट्रकने उडवून दिले. यात दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्या मित्राचा रूग्णालयात नेताना वाटेतच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने समाजमन सुन्न झाले असून, संपूर्ण गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, रविवारी गावात अनेकांच्या घरी चूल पेटली नाही. संध्याकाळी ६.३० वाजता या तिघांवरही शोकाकुल वातावरणात व शेकडोंच्या जनसमुदायात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्वांनाच आपले अश्रू आवरता आले नाहीत.

माळेगाव बाजार परिसरात रविवारी दुपारी घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. रविवार, १ मार्च रोजी दुचाकीवरून जात असलेल्या तीन शाळकरी मुलांना समोरून येणाऱ्या आयशर ट्रकने जोरदार धडक दिल्याने तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेमुळे दोन कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दर्शन रामेश्वर वैष्णव (१६) व साई रामेश्वर वैष्णव (१३) हे सख्खे भाऊ तसेच त्यांचा मित्र गणेश दीपक अप्तुरकार (१७) हे तिघे दुचाकीवरून तेल्हाराकडे जात होते. दुपारी १२ वाजताच्या सुमारास माळेगाव बाजार रोडवरील शेरी फाट्याजवळ समोरून भरधाव वेगात येणाऱ्या आयशर ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दर्शन व साई यांचा जागीच मृत्यू झाला.

### चालक फरार, गुन्हा दाखल

अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली व पंचनामा केला. या प्रकरणी सागर विष्णू अप्तुरकार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संबंधित चालकाविरुद्ध कलम २१८, १०६ बीएनएस १८४ एमव्ही ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### गावात शोककळा

दोन सख्ख्या भावांपैकी दर्शन वैष्णव हा दहावीची परीक्षा देत होता तर साई हा सातव्या वर्गात शिकत होता. तर त्यांचा मित्र गणेश अप्तुरकार हा ११ वीत होता. तीनही विद्यार्थ्यांचा अपघातात मृत्यू झाल्याने वैष्णव कुटुंबासह संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघाताने केवळ तीन जीव गेले नाहीत, तर दोन कुटुंबांची स्वप्नेही चिरडली गेली.

## सोन्या-चांदीच्या दरात मोठी तेजी!

वृत्तसंस्था २मार्च



**नवी दिल्ली :** इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धाचा फक्त त्यांच्या देशांवरच नव्हे तर संपूर्ण जगावरच परिणाम झालेला दिसत आहे. या युद्धामुळे सोने आणि चांदीच्या दरातही अस्थिरता निर्माण झाली आहे. दोन्ही धातूंचे दर सध्या चांगलेच वाढताना दिसत आहेत. युद्धाची ही स्थिती जर अशीच कायम राहिली तर येत्या काळात सोने आणखी महाग होऊन त्याचे भाव गगनाला भिडू शकतात, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

फेब्रुवारी महीना कालच संपला. या महिन्याभरात सोन्यात प्रचंड वाढ झालेली दिसून आली. जानेवारी महिन्याच्या तुलनेत फेब्रुवारी महिन्यात सोन्याचा भाव ५.०५६ टक्क्यांनी वाढला होता. आज सोने आणि चांदीच्या बाजारात खूप हलचल आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि भारतातील सराफा बाजारात सोन्याच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. सोमवार, २ मार्च रोजी, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, सोन्याच्या किमतीत २ टक्केची लक्षणीय वाढ दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोने हे प्रति औंस ५,३८४.५२ डॉलर्स या नवीन विक्रमी उच्चांकावर पोहोचले आहे. गेल्या आठवड्यात, मल्टी कमोडिटी एक्सचेंज वर चांदीच्या किमती २२,०५४(८.७२ टक्के) आणि सोन्याच्या किमती ५,२२८ रु(३.३३टक्के)ने वाढल्या आहेत. दिल्ली आणि मुंबईसारख्या प्रमुख शहरांमध्येही आज सकाळपासून सोन्या-चांदीच्या किमती वाढत आहेत. भारतीय स्पॉट मार्केटमध्ये सोन्याच्या किमती आज विक्रमी पातळीवर पोहोचल्या. मागील व्यापार सत्रात प्रति १० ग्रॅम १,६२,४९० रुपये असा भाव असलेल्या, सोन्याचा दर आज सोमवारी १,७३,०९० रुपयांवर पोहोचला. याचा अर्थ असा की फक्त एकाच व्यापार सत्रात सोन्याच्या किमतीत १० हजार रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली आहे.सोन्याच्या भावापाठोपाठ आज चांदीनेही लक्षणीय वाढ नोंदवली. शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) चांदीचा भाव२,८२,१४० रुपये प्रति किलोवर बंद झाला. पण आज सकाळी, सोमवारी चांदीचा दर २,९४,९०० रुपये प्रति किलोवर पोहोचला.

## आठवीतील मुलांनी आपल्याच मित्राला संपवले!

प्रतिनिधी २मार्च

**मुंबई :** मुंबईतील भांडुप परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. आठवीत शिकणाऱ्या १४ वर्षीय मुलाची त्याच्याच मित्रांनी मारहाण करून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हत्या केल्यानंतर पुरावा लपवण्यासाठी मृतदेह तलावात फेकून तो बुडाल्याचा बनाव करण्यात आल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी भांडूप पोलिसांनी १४ ते १५ वयोगटातील तिघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.मृत मुलाचे नाव सिद्धार्थ अजय लोंढे (१४) असे असून तो भांडुप पश्चिमेतील तुळशेटपाडा परिसरात कुटुंबासोबत राहत होता.

## ‘खुन्नस’ मधुन केला गेला राहूल कराळेंवर हल्ला

### सिव्हिल लाईन्स पोलिसांनी चौघांना घेतले ताब्यात

प्रतिनिधी २मार्च



**अकोला:** शिवसेना शहर प्रमुख राहुल कराळे यांच्यावर हल्ला करणारे चौघे सिव्हिल लाईन्स पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. उध्दव सेनेच्या शहर प्रमुखाच्या गाडीवर रविवारी हल्ला झाला होता. तपास अधिकारी व एस डी पो यांनी केलेल्या दाव्यानुसार राहूल कराळे यांच्या गाडीवर कुठे ही हल्ल्यात अग्नी शस्त्र व तलवारीचा वापर झाला नाही. चौघांपैकी एकाचा होता जुना वाद आणि जुन्या वादातून हा हल्ला झाला. आरोपींमध्ये लहान उमरी येथील हर्षल मंडलीक प्रमुख आरोपी असून इतरांमध्ये मोठी उमरीचा चेतन खंडारे,खरपचा सागर इंगळे, न्यू तापडीया नगरचा वैभव गोपनारायण याला पोलिसांनी अटक केल्याची माहिती आहे.

अकोला शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. उद्धव ठाकरे गटाचे शहरप्रमुख राहुल कराळे यांच्या वाहनाची रविवारी रात्री तिघा अज्ञातांनी तोडफोड केली. मोठी उमरी परिसरात कराळे हे त्यांच्या बुलोरो वाहनात बसले असताना हा प्रकार घडला. या हल्ल्याचा शिवसेना आमदार नितीन देशमुख यांनी तीव्र शब्दात निषेध केला त्याच बरोबर सिव्हिल लाईन्स पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला होता. रविवारी रात्री उध्दव सेना शहर प्रमुख राहूल कराळे यांच्या वाहनावर जोरदार हल्ला झाला.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावती सज्ज; जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन, नागरिकांसाठी हेल्पलाइन सुरू

**अमरावती :** देशातील सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले असून अमरावती जिल्ह्यात खबरदारीचे उपाय करण्यात आले आहेत. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) स्थापन करण्यात आला आहे. तसेच नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोशल मीडियावर येणाऱ्या अप्रमाणित संदेशांपासून दूर राहावे आणि अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा आपत्कालीन बाब आढळल्यास तात्काळ नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे. युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेता आरोग्य, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन आदी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

## अंबादेवी मंदिर परिसरात होळी दहनाचा उत्साह; सायंकाळी ६ पासून शहरात लगबग, भाविकांची गर्दी

प्रतिनिधी २ मार्च



अमरावती: शहरात आज पारंपरिक पद्धतीने होळी दहन साजरे केले जाणार असून, अंबादेवी मंदिर परिसरात विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सायंकाळी ६ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत शहरातील विविध भागांत होळी दहनाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अंबादेवी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत. मंदिर परिसरात सकाळपासूनच तयारीला सुरुवात झाली असून, होळीच्या ठिकाणी लाकूड रचणे, सजावट आणि सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण या सणाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

शहरातील विविध चौक, वसाहती आणि मंडळांकडूनही होळी दहनाचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी धार्मिक विधी करून होळी प्रज्वलित केली जाणार आहे. वाईटावर चांगल्याचा विजय दर्शविणारा हा सण शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, नागरिकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत, तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. अंबादेवी मंदिर परिसरासह संपूर्ण शहरात आज होळी दहनामुळे उत्सवी आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध उपक्रम

प्रतिनिधी २ मार्च

◆ गुळ तुला, अन्नदान आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती शहरात ठिकठिकाणी विविध सामाजिक व सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मित्रपरिवार व कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून वाढदिवस उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. यावेळी गौरक्षण येथे गुळतुळा कार्यक्रम पार पडला. तसेच गरजू नागरिकांसाठी नानक रोटी च्या माध्यमातून अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. विविध भागांत केक कापून व शुभेच्छा देत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. उपक्रमादरम्यान शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले व पुढील काळातही समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रथमेश कोचरम, संदेश खिलारे, डॉ.अभिजीत पवार, रोशन कडू, कुणाल विधळे,निखिल देशमुख, हितेश शेळके,रवींद्र गडेकर, आकाश हिवसे,प्रफुल डोंगरे,राहुल खुरसाण, निखिल भोजे,विशाल बोरखडे, मंगेश भटकर,अजित काळपांडे,हितेश शेळके,गौरव ठाकूर,मनोज गावंडे,मोहन चोरे ,सचिन रिठे आदींनी परिश्रम घेतले.

## पोहरा जंगलात रहस्यमय मृत्यू; विहिरीत सापडला अमर व्यासचा मृतदेह, घातपाताचा संशय बळावला

प्रतिनिधी २ मार्च

**अमरावती :** शहरातील छत्री तलाव ते मालखेड रोडदरम्यान असलेल्या पोहरा जंगल परिसरातील एका विहिरीत तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. अमर मोतीलाल व्यास (३८, रा. महादेवखोरी) असे मृताचे नाव असून तो १० फेब्रुवारीपासून बेपत्ता होता. रविवारी दुपारी सुमारे एकच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

अमर व्यास ९ फेब्रुवारी रोजी सुरतहून अमरावतीला आला होता. त्यानंतर १० फेब्रुवारीपासून त्याचा संपर्क तुटला. १४ फेब्रुवारी रोजी त्याची बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, पोहरा जंगलात वन विभागाकडून विहिरी रंगवण्याचे काम सुरू आहे. रविवारी काही मजूर पाण्यासाठी मुख्य रस्त्यापासून सुमारे ३०० मीटर अंतरावर असलेल्या विहिरीवर गेले असता त्यांना दुर्गंधी आली. विहिरीत पाहिले असता अर्धवट तरंगणारा मृतदेह दिसून आला. त्यांनी तात्काळ डायल ११२ वर पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, एसीपी संजय खताळे तसेच फ्रेजरपुरा ठाणेदार रोशन शिरसाठ यांनी घटनास्थळी भेट दिली. अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.

मृतदेहावर मोठ्या जखमा आढळल्या नसल्या तरी तो सुमारे तीन दिवसांपूर्वीचा असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. मृताच्या डाव्या हातावर 'पूजा' असे गोंदलेले आहे. शरीर फुगल्यामुळे ओळख पटविणे अवघड झाले होते. मात्र मिसिंगच्या चौकशीत कुटुंबीय फ्रेजरपुऱ्यात दाखल झाले आणि त्यांनी ओळख निश्चित केली.

घटनास्थळी बिअर व पाण्याच्या रिकाम्या बाटल्या तसेच अर्धवट जळालेला शर्ट आढळल्याने घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. हे साहित्य मृताचे की अन्य कोणाचे, याचा तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती डीसीपी गणेश शिंदे यांनी दिली. पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला आहे.

## महा. अनिस अमरावतीची पाक्षिक बैठक उत्साहात संपन्न; पर्यावरणपूरक होळीचे आवाहन

**अमरावती:** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महा. अनिस) अमरावती जिल्हा व शहर शाखेची पाक्षिक बैठक गुरुदेव सेवाश्रम, राधानगर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उत्साहात संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सतीश तराळ (उपाध्यक्ष, महा. अनिस अमरावती) होते. मार्गदर्शक म्हणून प्रवीण वासनिक (पर्यावरणप्रेमी, अमरावती), विजय डवरे (जिल्हा प्रधान सचिव, महा. अनिस अमरामा. प्रफुल्ल मंदा श्रीधर (जिल्हा कार्याध्यक्ष, महा. अनिस अमरावती) उपस्थित होते. प्रारंभी मागील बैठकीचा अहवाल सादर करण्यात आला व त्यास अनुमोदन देण्यात आले. बैठकीत शाखा बांधणी संदर्भात सविस्तर चर्चा करून आतापर्यंत ९ शाखांची स्थापना पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. ग्रामीण व शहरी भागात संघटन विस्तारासाठी लवकरच विशेष शाखा बांधणी दौरा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## उत्तरपत्रिका दडविल्या प्रकरणी मोठा गोंधळ; परीक्षकासह दोघांना अटक, एक आरोपी फरार

प्रतिनिधी २ मार्च

**अमरावती :** अंजनगाव सुर्जी येथील एका परीक्षा केंद्रावर दहावीच्या इंग्रजी विषयाच्या उत्तरपत्रिका कस्टडीत जमा न करता दडवून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी परीक्षक आणि सहपरीक्षकासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी सध्या फरार आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या उपशिक्षणाधिकारी रजनी शिरभाते यांच्या नेतृत्वाखाली २७ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ८.४० वाजता संबंधित परीक्षा केंद्रावर तपासणी करण्यात आली. त्या वेळी दहावीचा इंग्रजी विषयाचा पेपर सुरू होता.

तपासणीदरम्यान अनिल हाडोळे याच्याकडे संशयास्पद हालचाल दिसून आली. चौकशी केल्यानंतर त्याच्या शर्टमध्ये दडवून ठेवलेल्या दोन उत्तरपत्रिका आढळून आल्या. त्यापैकी एक इंग्रजी माध्यमाची तर दुसरी उर्दू माध्यमाची होती. नियमानुसार उत्तरपत्रिका तात्काळ मोजून सीलबंद करणे बंधनकारक असताना त्या बाहेर काढून एका व्यापाऱ्याला देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात परीक्षक सुधीर खोदे, सहपरीक्षक सुशीलकुमार अभ्यंकर व अनिल हाडोळे यांच्यासह दोन अज्ञात विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुधीर खोदे आणि अनिल हाडोळे यांना अटक केली असून सुशीलकुमार अभ्यंकर फरार असल्याची माहिती आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे आणि ठाणेदार सूरज बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे शिक्षण विभागाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## कर्तव्यपूर्तीचा सन्मान : अमरावती शहर पोलीस आयुक्तालयात तीन अधिकाऱ्यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी २ मार्च



**अमरावती:** शहर पोलीस आयुक्तालय येथे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या तीन पोलीस अधिकाऱ्यांचा निरोप समारंभ शनिवारी पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मीटिंग हॉलमध्ये कौटुंबिक वातावरणात पार पडला.

सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये किरणकुमार चिंचमलातपुरे (पोउपनिरी, नियंत्रण कक्ष), राजेंद्र कमेश्वर (पोउपनिरी/१७८, पोलीस मुख्यालय) आणि संजय दांडगे (सपोउपनिरी/५८५, पो.स्टे. खोलापुरी गेट) यांचा समावेश आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, पेन्शन ऑर्डर तसेच सेवानिवृत्ती प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच सेवा निवृत्त अंमलदारांच्या पत्नींना साडी व कुंडीतील रोपटे देऊन सन्मान करण्यात आला.


यावेळी पोलीस आयुक्तांनी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या अनुभवाचा लाभ भविष्यातही पोलीस विभागाला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच निवृत्तीनंतर मिळणाऱ्या रकमेची गुंतवणूक करण्यापूर्वी विश्वासार्हता तपासूनच योग्य नियोजन करावे, असा सल्ला दिला. सेवानिवृत्ती काळात शासकीय सुविधांबाबत काही अडचण असल्यास संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला शाम घुगे (पोलीस उपायुक्त परि-०२), गणेश शिंदे (पोलीस उपायुक्त परि-०१), रमेश धुमाळ (पोलीस उपायुक्त, मुख्यालय), सिमा दाताळकर (प्र. स.पो.आ. प्रशासन), निलेश करे (पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा) तसेच सेवानिवृत्त अधिकारी, त्यांचे कुटुंबीय व इतर अधिकारी-अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवर रस्त्यासाठी युवकाची टाकीवर चढून वीरू गिरी

◆ खासदार बळवंत वानखडे यांची यशस्वी मध्यस्थी

प्रतिनिधी २ मार्च



**दर्यापूर :** धामोडी येथील स्कूल व्हॅनचा चालक असलेला रोहन हरिदास डिक्कर या युवकाने शिवर -धामोडी हा रस्ता जिल्हा परिषदेने न केल्याने रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नगर परिषद जवळील पाण्याच्या मोठ्या टाकीवर चढून वीरु -गिरी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. खासदार बळवंत वानखडे यांनी मागणी मंजूर असून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. त्यामुळे युवकाने आंदोलन संपवले

सकाळी साडेआठ वाजता पाण्याच्या टाकीवर चढून त्याने विरुगिरी केल्याने घटनास्थळावर मोठी गर्दी झाली होती. पोलिसांनी सुद्धा पोलिस बंदोबस्त तैनात ठेवला होता. नगरपरिषदेचे अग्निशामक दल व उपजिल्हा रुग्णालयाची रुग्णवाहिका सुद्धा या ठिकाणी तैनात होती. वारंवार निवेदन देऊनही जिल्हा परिषदेने रस्त्याची दुरुस्ती न केल्याने युवकाने सिव्हिल लाईन मधील पिण्याच्या पाण्याच्या मोठ्या टाकीवर चढून आवाज उठवला. पोलिसांनी त्याला खाली उतरण्याची विनंती केली मात्र तो आपल्या मागणीवर ठाम होता.

खासदार बळवंत वानखडे आर आर सी नेटवर्कशी बोलताना म्हणाले, लागोपाठ सुट्टी आल्यामुळे विलंब झाला. परंतु या विषयाला मंजुरी मिळाली आहे. युवकाच्या सहका-यांना विश्वासात घेऊन त्यांनी आंदोलन मागे घेण्यास सांगितले. त्यानंतर युवक टाकीवरून खाली उतरला.

## नागपुर फोटो फेअर मधे अंबानगरी फोटो -व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे जिल्ह्यातील २०० वर सदस्य उपस्थित राहणार

प्रतिनिधी २ मार्च



**अमरावती :** नागपुर येथे होत असलेल्या फोटोग्राफर व व्हिडिओग्राफर बंधू भगिनी साठी एकाच छताखाली सर्व साहित्य बघायला मिळणार आहे

अंबानगरी फोटो - व्हिडीओग्राफर्स असोसिएशन ची दिनांक २६ फेब्रुवारी रोजी पत्रकार भवन येथे सभा पारपडली या सभेत नागपुर येथे होत असलेल्या भारत फोटो फेअर संदर्भात फेअर चे समन्वयक सुमित जैन यांनी होत असलेल्या फेअर संदर्भात संपूर्ण माहिती दिली फोटो फेअर मध्ये विविध कंपन्यांचे कॅमेरे त्याचबरोबर लाईटस , फोटोग्राफर व्हिडिओग्राफर साठी वापरण्यात येणारे विविध वेगवेगळ्या पद्धतीचे मॉनिटर ड्रोन व इतर मोठ्या प्रमाणात साहित्य भारत फोटो फेअर नागपुर मध्ये बघायला मिळणार आहे. छायाचित्रकारांसाठी खूप सार काही साहित्य एकाच छताखाली बघायला मिळणार आहे हि एक सुवर्ण संधी मिळणार आहे त्याकरिता त्यांनी सांगितले कि नेहमीच अमरावती वरून अंबानगरी फोटो - व्हिडीओग्राफर्स असोसिएशन चा चांगला प्रतिसाद मिळतो व यावर्षी आपण जास्तीण जास्त संख्येने उपस्थित रहाण्याचे आव्हान यावेळी सुमित जैन, ध्ण्झ्ण् चे राजन गुप्ता,चेतन जोशी यांनी केले छायाचित्रकार बंधू भगिनी यांना उपस्थित राहण्याची विनंती केली व त्याचबरोबर अंबानगरी फोटो- व्हिडिओग्राफर्स असोसिएशन च्या पदाधिकारी व सदस्य यांना सुद्धा या फोटो फेअर मध्ये आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आव्हान व विनंती केली. फोटो फेअर मधे उपस्थित असलेल्या पदाधिकारी यांच आम्ही सन्मान करानार आहे असे यावेळी त्यांनी सांगितले तसेच यावेळी अंबानगरी फोटो - व्हिडीओग्राफर्स असोसिएशन चे अध्यक्ष निलश्याम चौधरी यांनी अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त संख्येने छायाचित्रकार बंधू भगिनी फोटो फेअर ला उपस्थित राहण्याचे आव्हान केले.ঠ

## अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने चांदूर बाजार तालुका युवक काँग्रेसची महत्वपूर्ण बैठक

प्रतिनिधी २ मार्च

**अमरावती :** संघटनेच काम करत असतांना आगामी काळात प्रत्येक गावात शाखा व किसान महापंचायत अभियान व मानरेगा बचाव अभियान मध्ये सहभागी होन्याचे आव्हान केले

व युवक काँग्रेस च्या माध्यमातून युवकांच्या प्रश्ना बाबत जनआंदोलन सुरुच ठेवन्याचे आश्वासन केले यावेळी मार्गदर्शन करतांना युवक काँग्रेस चे पदाधिकारी -कपिल ढोके निरीक्षक अमरावती जिल्हा युवक काँग्रेस

राहुल येवले जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस अमरावती ,

,प्रदेश महासचिव उत्कर्ष देशमुख , खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष डॉ. प्रतापराव किटुकले ,अनिकेत ढेंगळे कार्याध्यक्ष अमरावती जिल्हा , प्रदेश महासचिव नितेश वानखड़े , तालुकाध्यक्ष किशोर देशमुख विधानसभा अध्यक्ष निलेश डांगे ,दरियापुर विधानसभा अध्यक्ष ऋग्वेद सरोदे ,

या बैठकीचे औचित्य साधून युवक काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. तालुका अध्यक्षपदी श्रेयस बर्वे, तेजस वानखडे, गोपाल कुरवाळे, रोशन शेकार व प्रितम मानापुरे यांची निवड करण्यात आली. तसेच गौरव वैद्य, अंकुश धाकडे, अभिजीत सावरकर, संविधान मोहोड, सोम्य सोनार, आदित्य देशमुख व साक्षी धानसाडे यांची विविध पदांवर नियुक्ती जाहीर करण्यात आली.

यावेळी तालुका अध्यक्ष श्रेयश बर्वे ,शुभम वाघमारे योगेश ईसळ सोपान पोहोकार सुरज लंगोटे स्वप्नील रेखे मंगेश ठाकरे आबिद भाई मनिष वाघमारे नितेश रेखे मिथुन पाठक मंगेश देशमुख गोपाल रडके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अजिंक्य बोबडे, अंकित कुरवाळे, पंकज कडू, महर्षी कडू, रिजवान हुसेन, शिवाजी काळे, नरेंद्र हिवे, आदित्य मानकर, प्रक्षिक भोरगडे, गजानन देशमुख, विजय राऊत, शैलेश टेकाळे, तुषार पाथरे, भैय्या काळे, शुभम वाघमारे, सचिन हिवराळे, अंकुश देशमुख, उमेश तायडे, मो. साबिर, मनोज देशमुख, पंकज नेहारे सर्व उपस्थित मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार!

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

## कारमधून मात्ता गावात आलेले चार संशयित ताब्यात, चिल्ड्रन बँक'च्या नोटांचे बंडल जप्त

प्रतिनिधी २ मार्च

**खामगाव :** तालुक्यातील मात्ता गावात महागड्या कारमधून आलेल्या चार संशयित युवकांना स्थानिक नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना सायंकाळी घडली. संबंधित युवकांकडून 'चिल्ड्रन बँक'च्या नोटांचे एक बंडल आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे बंडल पोलिसांनी जप्त केले.

माहितीनुसार, चार युवक महागड्या कारने अचानक मात्ता गावात दाखल झाले. गावात अपरिचित व्यक्ती फिरत असल्याचे लक्षात आल्यानंतर काही नागरिकांनी त्यांची चौकशी केली; मात्र संबंधित युवकांनी समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची भूमिका घेतल्याने नागरिकांचा संशय बळावला. परिस्थितीची गंभीरता ओळखून नागरिकांनी त्या चौघांना ताब्यात ठेवत तत्काळ खामगाव ग्रामीण पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कारसह संबंधितांना ताब्यात घेतले आणि पुढील चौकशीसाठी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आणले. झडतीदरम्यान युवकांकडून 'चिल्ड्रन बँक'च्या नोटांचे एक बंडल, एक आधार कार्ड, एक मतदार ओळखपत्र, दोन लहान बॅगा तसेच वैयक्तिक वापराचे साहित्य आढळून आले. पोलिसांनी हे सर्व साहित्य जप्त केले आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, प्रकरणी पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत. वृत्त लिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## देहविक्रीप्रकरणी आरोपींना कोठडी

प्रतिनिधी २ मार्च

**खामगाव :** तालुक्यातील शेलोडी येथे सुरू असलेल्या देहविक्री अड्ड्यावर कारवाई करत खामगाव ग्रामीण पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींना रविवार, १ मार्च रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

शेलोडी परिसरात देहविक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर खामगाव ग्रामीण पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींकडून पोलिसांनी एकूण १ लाख ५५ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.जप्त मुद्देमालात ४,८५० रुपये रोख रक्कम, चार दुचाकी वाहने (अंदाजे दीड लाख रुपये किंमत), तसेच इतर साहित्याचा समावेश आहे. आरोपींना अटक केल्यानंतर खामगाव न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २ मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## अडगाव बु. येथे शिवजयंतीनिमित्त किल्ले व रांगोळी स्पर्धांचे आयोजन

**अडगाव बु. :** येथील छत्रपती प्रतिष्ठान वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त बालकांसाठी आणि महिलांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ मार्च रोजी 'घरगुती किल्ला बनवणे' आणि 'भव्य रांगोळी स्पर्धा' रंगणार असून, विजेत्यांना रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. घरगुती किल्ला स्पर्धेत विजेत्यांना प्रथम क्रमांक ५,१०० रुपये व सन्मानचिन्ह संजयभाऊ राजनकार यांच्या कडुन, द्वितीय क्रमांक ३,१०० रुपये व सन्मानचिन्ह अमोल ढोकणे एपीआय यांच्या कडुन, तृतीय क्रमांक २,१०० रुपये व सन्मानचिन्ह डॉ. अविनाश बेदरकार यांच्या कडुन तसेच रांगोळी स्पर्धा प्रथम क्रमांक ५,१०० रुपये व सन्मान पत्र हितेश हागे, पोलीस पाटील यांच्या कडुन द्वितीय क्रमांक ३,१०० रुपये व सन्मानपत्र सौ. गायत्री नितीन चिम माजी सरपंच यांच्या कडुन तृतीय क्रमांक २,१०० रुपये व सन्मानपत्र सौ. संगीता नंदकिशोर अढाऊ माजी जि.प.अध्यक्ष अकोला यांच्या कडुन स्पर्धकांनी आपल्या किल्ल्याचा किंवा रांगोळीचा सेल्फी फोटो आणि व्हिडिओ दि ५/३/२६ पर्यंत निरीक्षक नाना देशमुख पत्रकार ९८२२३७३६११ यांना पाठविणे.

## अॅड. रूपाली राऊत विधीज्ञ संघाच्या उपाध्यक्षपदी अविरोध

**अकोला:** माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया यांचे निवडणुकीच्या नियमाने प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी होत असलेल्या निवडणुकांमध्ये महिला वकिलांना ३० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.



उपरोक्त आदेशाच्या पालनाकरिता पातुर विधीज्ञ संघामध्ये महिला प्रतिनिधी नेमण्याकरिता पुन्हा निवडणूक प्रक्रिया पार पडली. अॅड.रूपाली दामोदर राऊत यांना महिला उपाध्यक्षपदी अविरोध निवडून दिले. याप्रसंगी अॅड.रूपाली राऊत यांनी सर्वोच्च न्यायालय, बार कौन्सिल ऑफ इंडिया, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा तसेच पातुर विधीज्ञ संघातील सर्व सदस्यांचे आभार व्यक्त केले. पातुर विधीज्ञ संघामध्ये यापूर्वी विधीज्ञ संघाच्या अध्यक्ष पदाची सुद्धा जबाबदारी सांभाळलेली आहे. पातुर विधीज्ञ संघामध्ये प्रथमच महिला उपाध्यक्ष पदाची निर्मिती करण्यात आली आहे आणि त्या पदावर पहिल्यांदा अॅड. रूपाली राऊत यांची निवड झाली आहे त्याबद्दल पातुर विधीज्ञ संघाच्या सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# टाकळी खुर्द ग्रामपंचायतीत समस्यांचा महापूर


प्रतिनिधी २ मार्च

### जीवन खवले यांचा होळीमध्ये आत्मदहनाचा इशारा

**अकोट :** टाकळी खुर्द येथील ग्रामस्थांना दोन वर्षापासून नरकयातना भोगाव्या लागत आहे. ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार नागरिकांच्या जीवावर उठला आहे. याकडे लक्ष दिले नाही तर होळीत आत्मदहनाचा इशारा प्रहारचे नेते जीवन खवले यांनी दिला आहे.

सरपंच, ग्रामसेवक, अधिकारी नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे. दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे. अनेक समस्या तोंड वर काढत आहेत. पथदिवे, गटाऱ्याचे घाण पाणी, मच्छरांचे वाढते प्रमा, नाल्या साफसफाई कडे लक्ष वेधले आहे.

आज राजेश खुमकर गट विकास अधिकारी यांच्या दालनात उपसरपंच मीनाताई सह जीवन खवले व आदी ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांचा मोर्चाने आले. ठेपण्याची वेळ आज या नागरिकावर येऊन ठेपली. सुनील काकडे यांच्या कार्यपध्दतीची तात्काळ चौकशी करुन त्यांनी तत्काळ बदली करण्यात यावी. अन्य कार्यक्षम अधिका-याची नियुक्ती करण्यात यावी. त्यांची ७ दिवसात बदली न झाल्यास व त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास या विरुध्द तीव्र जनआंदोलनी ग्रामस्थाचे वतीने करण्यात येईल, असा इशारा दिला.



नगावातील दूषित पाण्याचे लिकेज गटार घाणीचे साम्राज्य पथदिवे प्रमाणपत्र विकास कामे दैनंदिन प्रशासकीय कामाच्या अनेक तक्रारी वाढत्या आहेत. फोन केल्यास अपमानाची वागणूक देणे या सर्व बाबी करिता त्यांची निष्काळजी व मनमानी कारभाराची तात्काळ चौकशी व बदली करून अन्य अधिकारी द्यावा.
**मीनाताई चंद्रशेखर गवळी,** उपसरपंच टाकळी खुर्द

ग्रामपंचायत अधिनिस्त कामाची तरतूद ग्रामपंचायत मध्ये जर उपलब्ध असेल आराखड्यात काम समाविष्ट असेल सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्यांनी यांच्याशी समन्वय करून ग्रामसेवकाने सदरचे काम सार्वजनिक स्वरूपाचे काम तातडीने करावे,
**राजेश खुमकर,**
गट विकास अधिकारी अकोट

## दिव्यांग महिला समाजसेविका संगीता ठोंबरे यांचा सत्कार



प्रतिनिधी २ मार्च

**बाळापूर:** शिवजयंतीच्या निमित्ताने एडवोकेट मुरलीधर राऊत मराठा हॉटेलचे संचालक यांच्या संकल्पनेतून विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे समाजसेवक यांचा मानवतेचा सन्मान सोहळा कार्यक्रमात सन्मानपत्र प्रमाणपत्र स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. येथील दिव्यांग समाजसेविका सौ. संगीता ठोंबरे यांचा या सोहळ्यामध्ये सत्कार करण्यात आला.

संगीता ठोंबरे यांना सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला आमदार अमोल मिटकरी, डॉ. रेखाताई पाटील, शुकदास महाराज, नाना पजई प्रमुख अतिथी होते. संगीता ताई यांचे समाजात उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देतात आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करतात हे खरोखरच कौतुकास्पद काम आहे आपल्या हातून असेच कार्य घडत राहो हीच अपेक्षा व्यक्त केली.

## होळी, वसंत ऋतूच्या आगमनाचा लोकप्रिय सण

प्रतिनिधी २ मार्च

**कुटासा:** होळी हा वसंत ऋतूच्या आगमनाचा लोकप्रिय सण आहे.जो वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक म्हणून फाल्गुन पौर्णिमेला साजरा केला जातो. होलिका दहन करून प्रल्हादाच्या कथेनुसार भक्त प्रल्हादाची विजयोत्सव साजरा केला जातो आणि दुसऱ्या दिवशी धुळवड खेळली जाते.

फाल्गुन पौर्णिमेच्या संध्याकाळी होळी पेटवली जाते ज्याला 'होलिका दहन म्हणतात. हे वाईटाचा नाश आणि चांगल्याची विजय दर्शवते लोक लाकडेशेणी आणि इतर वस्तू गोळा करून होळी पेटवतात आणि त्यात होलिकेची पूजा करतात. हे



समृद्धी आणि सुखाचे प्रतीक मानले जाते। 'होलाष्टक' होळीच्या आठ दिवस आधी (फाल्गुन अष्टमी ते पौर्णिमा) 'होलाष्टक' सुरू होते ज्या काळात कोणतेही शुभ कार्य (लग्न गृहप्रवेश मुंडन) केले जात नाही धुळवड/ धुलेंडी (रंगोत्सव): होलिका दहनाच्या दुसऱ्या दिवशी धुळवड साजरी केली जातेज्यामध्ये लोक एकमेकांवर रंगगुलाल आणि रंगीत पाणी टाकतात 'कथा आणि महत्व' हिरण्यकश्यपूची बहीण होलिकाजिला आगीत न जळण्याचे वरदान होतेतिने प्रल्हादाला मारण्यासाठी आगीत बसले होते परंतु भगवान विष्णूच्या कृपेने भक्त प्रल्हाद वाचला आणि होलिका जळून राख झाली.

## अवैध गोवंश कत्तलीविरोधात विश्व हिंदू परिषद आक्रमक

वि. प्रतिनिधी २ मार्च

### नगरपालिकेला निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**अकोट :** शहरात अवैधपणे जनावरांच्या कत्तली सुरू असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गोवंशाचा समावेश असल्याचा आरोप करत विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, शाखा आकोट प्रखंड यांच्या वतीने अकोट नगरपालिकेला निवेदन देण्यात आले. तातडीने कारवाई न केल्यास मोठे आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील काही भागांत सर्रासपणे जनावरांच्या कत्तली होत असून, काही दिवसांपूर्वी अकोट



शहर पोलिसांनी कुरेशीपुरा, गोल बाजार परिसरात धाड टाकून गोवंशाचे मांस व प्राण्यांचे अवयव जप्त केले होते. तरीदेखील शहरात विविध भागांत अवैध कत्तली सुरूच असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कत्तल करण्यात येणाऱ्या ठिकाणांहून रक्त व अवशेष सार्वजनिक गटार-नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे सांडपाणी व्यवस्थेवर ताण येत असून प्रदूषणात वाढ होत आहे. परिणामी मच्छरांचा प्रादुर्भाव वाढून रोगराईचा धोका निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगरपालिकेच्या संबंधित विभागांकडून याबाबत प्रभावी कारवाई होत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली.

या निवेदनावर तालुका अध्यक्ष विजय चंदन, प्रखंड संयोजक विजय कुलट, प्रखंड मंत्री मनिष ईटनारे, आनंद दिक्कर, शिवा टेमघरे ,अनंता कोकाटे, हर्षल अस्वार,दीपक रेखाते ,जगदीश दातीर, विजय दयावाणी,तुषार समदे ,अभिजीत मंडले, रोशन कमलकर,भरत चिलवंत,लखन गिऱ्हे,विकास गंधारे,. अजय शिरसाट,शिवम दुबे,चेतन वाघोळे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संत विचार पुढील पिढीत संक्रमित करणे हीच पंजाबरावांना खरी आदरांजली

प्रतिनिधी २ मार्च

**अकोट:** 'श्री क्षेत्र श्रद्धासागर निर्माण हा वै. पंजाबराव हिंगणकर यांच्या गुरुनिष्ठेचा आणि कार्य कर्तृत्वाचा अमूल्य ठेवा आहे. गुरुवर्य श्री संत वासुदेव महाराजांच्या विचारांवर ही संस्था उभारून त्यांनी केलेले कार्य कधीही विसरता येणार नाही. महाराजांचे हे महान विचार पुढील पिढीत संक्रमित करणे हीच खऱ्या अर्थाने 'भाऊं'ना दिलेली आदरांजली ठरेल,ठ असे भावपूर्ण उद्गार धर्मशास्त्र तथा संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह.भ.प. प्रशांत महाराज ताकोते यांनी काढले.?श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक वै. ह.भ.प. पंजाबराव हिंगणकर यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित प्रवचन कार्यक्रमात ते बोलत होते.ते पुढे म्हणाले भाऊंच्या पवित्र स्मृती सत्कर्म आणि सदाचारांची प्रेरणा देत राहतील.कार्यक्रम प्रारंभी श्री पंजाबराव भाऊंच्या प्रतिमेचे पूजन



संस्था अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले व प्रशांत महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाऊंच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. प्रशांत महाराज यांचा वाढदिवस असल्याने, संस्थाध्यक्ष वासुदेवराव महाराज यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार व अभिष्टचिंतन करण्यात आले. सोहळ्याला संस्थेचे विश्वस्त गजानन दुधाट, अनिल कोरपे, नंदकिशोर हिंगणकर, ह.भ.प. विष्णू महाराज गावंडे, मध्यस्थीचे कोषाध्यक्ष जयकृष्ण वाकोडे, सचिव सुरेशदादा कराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नागोराव कुलट, शंकर लोखंडे, बंडू पा. कुलट, राहुल पा. बहाळे, नागोराव वानखडे, मधुकर पुंडकर, सुधाकर हिंगणकर, प्रा. गजानन हिंगणकर, रामदास मंगळे, संस्थेचे व्यवस्थापक अमोल मानकर, सह-व्यवस्थापक दिलीप कुलट यांच्यासह मोठ्या संख्येने वासुदेव भक्त उपस्थित होते.

## चिमुकली मुले चाकोल्या बनवण्यात मग्न

प्रतिनिधी २ मार्च

**अडगाव:** वसंत ऋतूत येणारा मांगल्याचा पहिला सण म्हणजे 'होळी'. मात्र, काळानुसार होळीच्या स्वरूपात मोठे बदल झाले असून, एकेकाळी आकर्षणाचे केंद्र असलेल्या शेणाच्या चाकोल्या आता काळाच्या पडद्याआड जाऊ लागल्या आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात नवी पिढी या अस्सल मातीतील परंपरेपासून कोसो दूर गेल्याचे चित्र दिसत आहे.

होळीच्या काही दिवस आधीपासूनच लहान मुलांची शेणापासून विविध आकाराच्या चाकोल्या, नक्षीदार वस्तू आणि नारळ तयार करण्याची लगबग सुरु व्हायची चाकोल्या वाळवून त्यांचा मोठा हार तयार केला जाई. मुलांमध्ये 'कोणाचा हार मोठा' याची जणू स्पर्धाच रंगायची. या प्रक्रियेतून मुलांचा निसर्गाशी आणि श्रमाशी एक वेगळाच आनंददायी संबंध जोडला जायचा.



बदलत्या शेतीचे यांत्रिकीकरण झाल्यामुळे गावागावांतून गोधन कमी झाले आहे. परिणामी, चाकोल्या तयार करण्यासाठी आवश्यक असलेले शेण मिळणे आता कठीण झाले आहे.

अभ्यासाचा ताण आणि मोबाईलच्या युगात मैदानी श्रमाचे काम करण्याकडे नव्या पिढीचा कल कमी झाला आहे. पूर्वी चाकोल्यांच्या हाराला होळीत मानाचे स्थान असायचे. मात्र, आता हा उत्सव केवळ लाकूड आणि गोवऱ्या जाळण्यापुरताच मर्यादित राहिला आहे.

## ज्ञानेश्वर माऊलीने प्रथम रेड्याला दिक्षा देवून त्याचे कडून वेद वदवून घेतले - देवी वैभवीश्रीजी

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला:** ग्राम केळीवेळी येथे स्व.मधुकरराव बुले यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित श्रीमद् भागवत सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे चौथे पुष्प गुंफतांना देवी वैभवीश्रींनी संतांची महती विषद करतांना "संत ज्ञानेश्वराचे उत्तम उदाहरण देत संत ज्ञानेश्वरांनी रेड्याला दिक्षा देवून त्या रेड्याकडून वेद वेदवून घेतले" असल्याचे सांगितले. संत आपल्या आयुष्यामध्ये समाजामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणून समाजातील श्रद्धा व अंधश्रद्धेतील दरी कमी करुन भटकलेल्यांना योग्य मार्गदर्शन नियमितपणे करित असतात. त्यामध्ये पुढे बोलतांना त्यांनी उपस्थित युवतींना मार्गदर्शन करतांना समाजातील ज्वलंत प्रश्न लव्ह जिहादवर आपले भाष्य करीत युवतींनी सजग राहून आपल्या आई-वडीलांची मान शरमेने खाली होईल असे कुठलेही कृत्य युवतींनी न करता केवळ दोन दिवसाच्या आकर्षणाकडे न जाता संपूर्ण आयुष्याचा विचार करावा व आपल्या आई-वडीलांना कन्यादानाचे पुण्य अर्जित करु द्यावे



असे सुद्धा मार्गदर्शन यावेळी देवी वैभवीश्रींनी उपस्थित युवतींना केले. नामस्मरणामध्ये जीवनाचे सार्थक असून नामस्मरणाचा महिमा सांगतांना दीदींनी अनेक संत महात्म्यांनी नामस्मरणामुळे आपल्या जीवनाचा प्रवास हा सुकर केल्याचेही यावेळी सांगितले. भागवत सप्ताहामध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आकर्षक असा श्रृंगार कृष्णाला श्री माधवराव बकाल व सौ. मुक्ताताई बकाल यांनी सजवून आणले होते. कृष्ण जन्माचे औचित्य साधून संपूर्ण मंडपामध्ये आकर्षक अश्या फुलांनी सजविले होते.

श्री क्षेत्र वृंदावन येथील कथा प्रवक्त्या देवी वैभवीश्रीजी यांच्या सुमधूर वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन बुले परिवार व समस्त गावकरी मंडळी केळीवेळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## धनादेश अनादर प्रकरणी आरोपीस शिक्षा

वि. प्रतिनिधी २ मार्च

**अकोट :** धनादेश अनादर प्रकरणी अकोट येथील न्यायालयाने आरोपीस शिक्षा सुनावली आहे. २०/०२/२०१९ रोजी दाखल झालेल्या या प्रकरणाचा निकाल देताना मा. सह,न्यायिक दंडाधिकारी ए. ए. माळी यांनी आरोपीस कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा सुनावत धनादेशाच्या रकमेसह २५ टक्के रक्कम फिर्यादी संस्थेला देण्याचा आदेश दिला.

प्राप्त माहितीनुसार, आदित्य अनघा मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था, नागपूर शाखा अकोट येथून राहुल बबनराव काटोले यांनी वैयक्तिक स्वरूपात कर्ज घेतले होते. मात्र सदर कर्जाची परतफेड करण्यात अपयश आल्याने पतसंस्थेने पाठपुरावा केला. त्यानंतर आरोपीने कर्जफेडीपोटी पतसंस्थेला धनादेश दिला; परंतु संबंधित धनादेश बँकेत सादर केल्यानंतर तो अनादरित (बाउन्स) झाला.

याबाबत पतसंस्थेने आरोपीस नोटीस बजावली. त्यानंतरही रक्कम अदा न केल्याने धनादेश अनादर प्रकरणी फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली. न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान फिर्यादी संस्थेने सादर केलेल्या पुराव्यांवरून आपला दावा सिद्ध केला.

दरम्यान, आरोपीने न्यायालयात धनादेशाची रक्कम जमा करून प्रकरणातून सुटका करण्याची विनंती केली होती. मात्र फिर्यादी संस्थेच्या वतीने सागर अ. मोकशे तसेच अॅड. रविश कुलकर्णी यांनी आरोपीस शिक्षा देण्याची मागणी करत प्रभावी युक्तिवाद केला.

सर्व बाजूंचा विचार करून मा. न्यायालयाने आरोपीस कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा सुनावत धनादेशाच्या रकमेसह २५ टक्के रक्कम भरपाई म्हणून फिर्यादी संस्थेला अदा करण्याचा आदेश दिला. सदर प्रकरणात फिर्यादी संस्थेच्या वतीने अधिकृत अधिकारी म्हणून सागर अ.मोकशे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर न्यायालयीन कामकाज अॅड. रविश कुलकर्णी यांनी युक्तिवाद केला.

# गायत्री नगरात होळीच्या पर्वावर रंगणार कीर्तन महोत्सव

### संत तुकाराम महाराज बीजोत्सव सेवा समितीद्वारा आयोजन




प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** मागील नऊ वर्षाप्रमाणे याही वर्षी गायत्री नगर, कौलखेड रोड, अकोला येथील गायत्री मंदिराच्या प्रांगणात श्री संत तुकाराम महाराज बिजोसवानिमित्त होळीच्या शुभ-परववर म्हणजेच गुरुवार दि. ५ मार्च ते शुक्रवार दि. १३ मार्च दरम्यान रात्री आठ ते दहा या वेळात भव्य दिव्य कीर्तन महोत्सव सोहळा रंगणार आहे.

या नऊ दिवसात परिसरातील वातावरण भक्तीमय होत असून संपूर्ण जिल्ह्यातून भाविक या सोहळ्याची वाट बघत असतात. विशेष म्हणजे या सप्तहात संत तुकाराम महाराजांचा बीजोत्सव, एकनाथ महाराजांची षष्ठी, व तिथीनुसार शिवजयंती असा त्रिरत्न उत्सवाचा योग असल्यामुळे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी असते.

या सोहळ्यात दररोज अखंड विना, सकाळी पाच ते सहा काकडा, सकाळी दहा ते बारा व दुपारी तीन ते पाच गाथा पारायण, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ व रात्री आठ ते दहा महाराष्ट्रातील ख्यात्मनांक कीर्तनकारांची कीर्तने ठेवण्यात आली आहे.

या मध्ये दिनांक ५ मार्चला रामायणाचार्य हभप संजय महाराज पाचपोर, ६ मार्चला भागवताचार्य भरत महाराज चौधरी, ७ मार्चला ज्ञानेश्वरी मर्मज्ञ ह भ प एकनाथ महाराज चतुर शास्त्री, ८ मार्चला वेदांताचार्य ह भ प वैभव महाराज राक्षे, ९ मार्चला ज्ञानसिंधू ह भ प संदिपन महाराज शिंदे, १० मार्चला विद्यावाचस्पती ह भ प जयवंत महाराज बोधले, ११ मार्चला वारकरी भूषण ह भ प चैतन्य महाराज देगलूरकर, १२ मार्चला भाषा प्रभू ह भ प जगन्नाथ महाराज पाटील तर १३ मार्चला भागवताचार्य ह भ प प्रशांत महाराज ताकोते यांचे काल्याचे किर्तन होणार असून काल्याच्या बुंदी प्रसादाने सांगता होणार आहे. गायनाचार्य म्हणून हभप अनिरुद्ध महाराज नालेगावकर आळंदी व ह भ प किशोर महाराज लढे अकोला, मृदंगाचार्य विशारद चंद्रकांत महाराज बागल आळंदी व ज्ञानेश्वर महाराज यादगिरे अकोला तर टाळकरी मंडळी संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ मंडळ देगाव गायत्री नगर कौलखेड खडकी उमरी यांची सात संगत लाभणार आहे तरी जास्तीत जास्त भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संत तुकाराम महाराज बीजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर, कौलखेड यांनी केले आहे.

**श्री. रवि महाले, तहसिलदार, कारंजा यांचे कार्यालय, कारंजा**

रा.मा.क्र.टी. एन.सी.-४३/भामदेवी/ /२०२५-२६

**जाहीरनामा**

या जाहीरनाम्याद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार तुळशीराम भगतराव म्हसके यांचे मालकीची व कब्जातील मौजे भामदेवी, ता. कारंजा येथील सर्व्हे नं./ गट नं. 80 मध्ये क्षेत्र 2.78 हे.आर. पो.ख. क्षेत्र 0.28.00 हे. आर. आकार रु.पै. 4.57 व अन्नपूर्णाबाई महादेवराव म्हसके यांचे नावे 1.62 हे. आर. आकार रु.पै. 2.43 भोगवटदार वर्ग-1 शेत जमीन असून या शेत जमीनीमधील 7/12 चे इतर अधिकारांमध्ये **भगवान कुणबी या नाथाचे साधे कुळ** असून, सदर कुळाची नोंद कमी करणे करीता अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

याबाबत कोणास हरकत/ आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून) 15 दिवसाचे आज लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकती/ आक्षेप सादर करावे विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/ हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळः कारंजा**
**दिः 18/02/2026**

**( रवि महाले )**
**तहसिलदार, कारंजा**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पतीने केली पत्नीची हत्या; मृतदेह तुरीच्या गंजीत लपवला

प्रतिनिधी २ मार्च



**यवतमाळ :** सततच्या कौटुंबिक वादातून पतीने पत्नीची कुऱ्हाडीने हत्या केल्याची धक्कादायक घटना बोरी (इचोड) शेतशिवारात ही घटना घडली. वडकी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

वैजयंतीमाला श्रीनिवास येलके (४५) असे मृत महिलेचे नाव असून, श्रीनिवास येलके (५०) असे अटकेत असलेल्या पतीचे नाव आहे. ही घटना वडकी पोलीस स्टेशन हद्दीत शनिवारी दुपारी घडल्याचे समजते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमध्ये काही दिवसांपासून घरगुती कारणांवरून वाद सुरू होते. शनिवारी दोघेही आपल्या शेतात तूर काढणीसाठी गेले असताना त्यांच्यात पुन्हा वाद झाला. या वादाचे रूपांतर हिंसाचारात होत संतापाच्या भरात श्रीनिवास याने पत्नीवर कुऱ्हाडीने वार केले. गंभीर जखमी झालेल्या वैजयंतीमाला यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर संशय टाळण्यासाठी आरोपीने मृतदेह तुरीच्या गंजीत लपवून ठेवला. रविवारी सकाळी घटनेची माहिती समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी राळेगाव येथे पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी संशयाच्या आधारे श्रीनिवास याला ताब्यात घेतले असता सुरुवातीला त्याने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला; मात्र चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे सांगण्यात आले. वारंवार होणाऱ्या वादातून सुटका मिळवण्यासाठी हे कृत्य केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. या प्रकरणाचा अधिक तपास वडकी पोलीस करीत आहेत.

## रेतीच्या ट्रॅक्टरखाली युवक ठार

प्रतिनिधी २ मार्च

**बाभूळगाव :** तालुक्यात अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पलटी होऊन ३० वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेआठच्या सुमारास विरखेड–बाभूळगाव मार्गावर हा अपघात घडला.

सुशील राजेंद्र जांभळे (३०) असे मृत युवकाचे नाव आहे. तो विरखेड येथील रहिवासी असून रुषिकेश पांडे यांच्या ट्रॅक्टरवर मजुरीचे काम करत होता. घरात आई व लहान भाऊ असल्याने कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर होती.

माहितीनुसार, अवैध रेती भरून ट्रॅक्टर जात असताना अचानक हुक तुटल्याने ट्रॅक्टर पलटी झाला. ट्रॅक्टरच्या मुंड्यावर बसलेला सुशील खाली पडून चाकाखाली दबला. स्थानिकांनी तत्काळ त्याला रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

घटनेनंतर मृतकाचे काका संजय मोतीराम जांभळे यांनी बाभूळगाव पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून पुढील तपास जमादार निलेश भुसे करीत आहेत. अवैध रेती वाहतुकीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे

# टॅक्टर पलटी; तरुण जागीच ठार

प्रतिनिधी २ मार्च




**मारेगाव :** मारेगाव पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या मार्डी येथील २१ वर्षीय तरुण टॅक्टर खाली दबून मुत्यु पावला. दि.१ मार्च २०२६ रोज रविवारला सायंकाळी ७ वाजता च्या दरम्यान घटना घडली.

तो शेतातून काम आटोपून परत येत असतांना टॅक्टर अचानक खोल खड्यात पलटी झाला. चालकाचा टॅक्टर खाली दबून मुत्यु झाला. अभय बंडु येरने रा. मार्डी वय २१ वर्ष असे मृतकाचे नाव आहे. तो एकुलता एक असून मजुरी करून कुटुंबाला आधार देत होता. त्याच्या अचानक जाण्याने मार्डी गावावर शोककळा पसरली आहे. त्याच्या मागे आई, वडील, बहिन असा परिवार आहे.

# माथार्जुन विश्रामगृहाजवळ रस्त्याखाली मोठा खड्डा

प्रतिनिधी २ मार्च



**झरी :** तालुक्यातील माथार्जुन विश्रामगृहाजवळील माथार्जुन ते सुरदापूर–बोरी मार्गावर मुसळधार पावसाच्या पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे रस्त्याच्या डाव्या बाजूचा मोठ्या प्रमाणात खडा व मुरूम वाहून गेला आहे. त्यामुळे रस्त्याचा खालचा भाग उखडून खड्डेसदृश स्थिती निर्माण झाली असून वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण झाला आहे. सदर मार्गावरून दररोज गावांमधील नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच शेतकरी मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र रस्त्याची रुंदी कमी झाल्याने समोरासमोर येणाऱ्या वाहनांना बाजू देताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार व शालेय वाहने यांच्यासाठी हा मार्ग अधिक धोकादायक ठरत आहे. रात्रीच्या वेळी अपुरी प्रकाशव्यवस्था असल्याने अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. स्थानिक नागरिकांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ पाहणी करून रस्त्याची दुरुस्ती करावी, तसेच खबरदारीचा उपाय म्हणून इशारा फलक, बॅरिकेड्स व इतर सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरीत उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शेंबाळपिंपरीत वार्षिक स्नेहसंमेलन; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

प्रतिनिधी २ मार्च



**शेंबाळपिंपरी :** येथील विविध शैक्षणिक संस्थांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सांस्कृतिक सादरीकरणांनी गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक मराठी शाळा शेंबाळपिंपरी यांचा "जल्लोष 2026", गोल्डन किड्स इंग्लिश मिडियम स्कूल शेंबाळपिंपरी यांचा "कलारंग 2026", महाराष्ट्र इंग्लिश स्कूल शेंबाळपिंपरी यांचा "किल बिल 2026" तसेच यशवंत विद्यालय व दत्तराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय शेंबाळपिंपरी यांचा "भरारी 2026" हे स्नेहसंमेलन कार्यक्रम दिमाखात पार पडले.

या कार्यक्रमांसाठी जैनुल सिद्दीकी यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी सर्व शाळांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहून आयोजकांकडून शाल, श्रीफळ व पुष्पहार स्वीकारला. मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. नृत्य, नाटिका, गीत व विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि टीमवर्कचे उत्कृष्ट दर्शन घडविले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास सरपंच रविंद्र महल्ले, पुसद पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धीरज आडे, खंडाळा पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनीत घागे, राजे दिलीपराव दादा देशमुख, सौ. सुनिता दिलीपराव देशमुख, माजी प्राचार्य विजयकुमार वाकडे, एएसआय शिवाजीराव देशमुख, शिक्षण विस्तार अधिकारी टेकाळे, पोलीस पाटील प्रतिभा कांबळे, शेंबाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष संग्राम देशमुख, गजानन बोक्से पाटील, अजय झरकर, तसेच सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली असून कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'निर्माण' प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा

प्रतिनिधी २ मार्च



**झरी-जामणी :** झरी-जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी 'निर्माण' प्रकल्पांतर्गत अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. हा उपक्रम युनायटेड वे मुंबईच्या अंमलबजावणीखाली व जॉन डीअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या आर्थिक सहाय्याने राबविण्यात आला. तेरा ग्रामपंचायतींमध्ये विविध विकासात्मक उपक्रम राबविण्याचा हेतू असलेल्या या प्रकल्पाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हा आहे. या दौऱ्यात सुमारे ५० शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

अभ्यास दौऱ्यादरम्यान कृषी विज्ञान केंद्र यवतमाळच्या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना विविध आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शन घडवून दिले. यात सुधारित वाणांची लागवड, पीक प्रात्यक्षिके, सेंद्रिय शेती व सेंद्रिय खत निर्मिती प्रक्रिया, ठिबक व तुषार सिंचन पद्धतीद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर तसेच कीड व रोग व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले गेले. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहून आधुनिक तंत्रज्ञानाबाबतची माहिती आत्मसात केली.

या दौऱ्यात डॉ. राहुल चव्हाण (कृषी अभियांत्रिकी), डॉ. प्रमोद मगर (किटकशास्त्र), श्री मयूर ढोले (विस्तार शिक्षण) आणि डॉ. गणेश कासुळे (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र) यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. पारंपरिक शेतीत नव्या प्रयोगांची जोड दिल्यास उत्पादन वाढीस मदत होईल, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

अभ्यास दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची व तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की, या उपक्रमामुळे शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला असून भविष्यात उत्पादनवाढीस चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या दौऱ्याने 'निर्माण' प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य करत शेतकऱ्यांचे मनोबल वाढवले असून, यवतमाळ जिल्ह्यातील शेती क्षेत्रात सुधारणा घडविण्यात मोठा हातभार लागेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

# सात वर्षांच्या चुलत भावांचा पहिला रोजा

प्रतिनिधी २ मार्च



**आर्णी :** मुस्लिम धर्माचा पवित्र रमजान महिना सुरू होताच शहरातील दोन चिमुकल्यांनी आपल्या जीवनातील पहिला रोजा ठेवत धार्मिक परंपरेची सुंदर सुरुवात केली. सामाजिक कार्यकर्ते जानी सोलंकी यांचे सुपुत्र अझेन जानी सोलंकी आणि त्यांचे चुलत भाऊ राहत राहील सोलंकी या दोघांनीही अवघ्या सातव्या वर्षी उत्साहाने रोजा पाळला.

लहान वयातच धार्मिक संस्कार जपत दोघांनी संयम आणि श्रद्धेचे उदाहरण घालून दिले. त्यांच्या या कृतीमुळे सोलंकी कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक व परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

रमजान महिन्यात रोजा, नमाज आणि इबादतीद्वारे संयम, श्रद्धा व बंधुभावाचा संदेश दिला जातो. या चिमुकल्यांच्या उपक्रमामुळे समाजातही सकारात्मक भावना व्यक्त होत आहेत.

# पारवा येथे सकल हिंदू विशाल संमेलन उतसाहात

प्रतिनिधी २ मार्च

**पारवा :** येथील अकरा वरचा गणपती गणेश मंदिर पारवा येथे २८ तारखेला दुपारी सकल हिंदू विशाल संमेलन उत्साहात पार पडले.

दुपारी बारा वाजतापासून भजनी मंडळाच्या सहभागाने गावफेरी काढण्यात आली. या वेळी लहान मुला-मुलींनी राम, सीता आणि लक्ष्मण यांची वेशभूषा परिधान करून सहभाग घेतला.

दुपारी तीन वाजता सभेला प्रारंभ झाला. गुरु महाराज बाळू यांनी आपल्या प्रवचनात, "श्रीरामांसोबत भाऊ लक्ष्मण होता म्हणून रावणाचा वध शक्य झाला," असे प्रतिपादन केले. तसेच श्रीराम-सीतेने १४ वर्षांच्या वनवासात कोणाकडेही तक्रार केली नाही, असे सांगत त्यांनी बंधुभाव, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश दिला. संमेलनात प्रेमदास पकडे, योगगुरू अमरावती तसेच प्रमुख वक्ते शशांकजी गौतमी (विभाग प्रमुख, यवतमाळ) यांनी मार्गदर्शन केले. भारताच्या अखंडतेसाठी हिंदू समाज एकत्र राहणे आवश्यक असून शंभर टक्के मतदान करणेही तेवढेच महत्त्वाचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. भावा-भावांतील नाते दृढ ठेवण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.कार्यक्रमास पारवा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राजू जोशी यांनी केले, तर जयपाल घटल्यावर यांच्या हस्ते भारतमातेची आरती करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# आरोग्य शिबिराचा ७५२ रुग्णांना लाभ



प्रतिनिधी २ मार्च

**आर्णी :** आर्णी-केळापूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार राजूभाऊ तोडसाम मित्रपरिवार आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद लाभला. शिबिरात एकूण ७५२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी सुमारे २२६ रुग्णांना दीर्घकालीन आजार आढळून आल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सावंगी मेघे येथे मोफत ने-आण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. उपचारासाठी आज चौथ्या टप्प्यातील बस रवाना करण्यात आली.या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळाला असून परिसरात समाधान व्यक्त होत आहे. यावेळी शहराध्यक्ष विशाल देशमुख, मंगेश वानखडे, किसन लडके आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'नो पार्किंग' प्रश्न परिवहन मंत्र्यांच्या दालनात; अवैध वाहतुकीवर कारवाईचे आदेश



प्रतिनिधी २ मार्च

**उमरखेड :** शहरातील बसस्टॉप परिसरात २०० मीटर 'नो पार्किंग' झोनमध्ये सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीचा मुद्दा थेट मंत्रालया पर्यंत पोहोचला आहे. या प्रकरणाची दखल घेत परिवहन मंत्र्यांच्या दालनात महत्त्वाची बैठक पार पडली.

बैठकीत 'नो पार्किंग' झोनमध्ये सुरू असलेल्या खासगी ट्रॅव्हल्सच्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ला मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा चर्चेस आला.

त्यानंतर मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा वाहनांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याची माहिती आहे.

बैठकीनंतर विभाग नियंत्रक, यवतमाळ यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ यांना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तत्काळ कारवाई करण्याबाबत पत्रव्यवहार केल्याचे समजते. त्यामुळे आता उपप्रादेशिक परिवहन विभागामार्फत नेमकी कोणती कारवाई होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### आरटीओसोबत 'सेटिंग'ची चर्चा जोरात

- उमरखेड बसस्टॉप परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीबाबत यापूर्वी अनेक तक्रारी आणि वृत्तपत्रीय बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली होती. आता परिवहन मंत्र्यांच्या दालनात बैठक होऊन स्पष्ट आदेश देण्यात आल्यानंतरही कारवाई होईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काही ट्रॅव्हल्स चालक आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक 'सेटिंग' असल्याच्या चर्चांना शहरात उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन प्रत्यक्षात किती प्रभावी पावले उचलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विदर्भस्तरीय महिला क्रिकेट संघाचा गौरव

प्रतिनिधी २ मार्च

**यवतमाळ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दुसऱ्या पर्वातील चाळीसावे पूजन रविवारी (दि. १ मार्च २०२६) सायंकाळी ६.३० वाजता म. फुले चौक, आझाद मैदान समोर उत्साहात पार पडले.

या विशेष पूजनाचा मान नुकत्याच पार पडलेल्या विदर्भस्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या संघाच्या हस्ते करण्यात आला. यवतमाळ येथे झालेल्या या स्पर्धेत विजेतेपद पटकावून शहराचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल समितीतर्फे महिला क्रिकेट संघाचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी संघाच्या कर्णधार अनिता वराडे, क्रांती राऊत, ज्योती मसराम यांसह इतर खेळाडू तसेच प्रशिक्षक प्रवीण बहादे आणि प्रमोद गजभिये यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास लतिका शेळके, श्रेया शिंदे, पवन थोटे, सुरेश भावेकर, पुरुषोत्तम ठोकळ, शशिकांत लोळगे, विजय शिंदे, सुनील सोडगीर, प्रदीप पुनसे, बलदेव गायनर, किशोर शेळके, अंकुश गलाट, निखिल गोफने, विजय जाधव, निलेश चामाटे, विलास अवघड, श्याम उघडे, दत्तात्रय फोकमारे, मंगेश खांदेल, पंकज अवघड, अविनाश कोल्हे, श्याम इंगलवार, स्वप्नील मिठे, विलास येवतीकर, शेखर येणोरकर, मंगेश गोडंबे, पंकज राऊत, सुमेद मेश्राम, चंद्रकांत हुडे आदी समाजबांधव व भगिनी उपस्थित होते.



# उषा आरेवार यांचे निधन

प्रतिनिधी २ मार्च



**पारवा :** पारवा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संजय आरेवार यांच्या मातोश्री उषा लक्ष्मणराव आरेवार यांचे २८ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजता निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांमध्ये शोककळा पसरली आहे. उषा आरेवार यांच्या मागे चार मुले आणि एक मुलगी असा मोठा परिवार आहे. शनिवार दुपारी १ वाजता पारवा समशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनामुळे गावातील जनतेतही शोक व्यक्त केला आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# अकोटमध्ये खंडणीबाज ‘स्वयंघोषित संपादक’चा हैदोस

खोट्या बातम्यांद्वारे बदनामी व खंडणीचा आरोप
अधिकारी, संस्थाचालक, व्यावसायिक, राजकीय नेते झाले त्रस्त
स्वयंघोषित संपादकावर विविध जिल्ह्यांत एक नाही अनेक गुन्हे दाखल

प्रतिनिधी २ मार्च

**अकोट:** अकोट शहरात गेल्या काही महिन्यांपासून स्वतःला संपादक म्हणून मिरवणाऱ्या एका व्यक्तीच्या कारवायांमुळे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, नामांकित व्यावसायिक, पत्रकार, संस्थाचालक तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित व्यक्ती छायाचित्रांसह खोटे व निराधार वृत्त प्रसिद्ध करून बदनामी करत असल्याचा आरोप होत आहे. माहितीनुसार, संबंधित स्वयंघोषित संपादकाकडून काही व्यक्तींना लक्ष्य करून त्यांच्या विरोधात आधारहीन बातम्या सातत्याने प्रसिद्ध केल्या जात आहेत. संबंधितांकडून आर्थिक लाभ किंवा कथित ‘तडजोड’ रक्कम मिळे पर्यंत बदनामीकारक वृत्तप्रसारण सुरू ठेवले जाते, असा आरोप विविध स्तरांतून पुढे येत आहे. ज्या दैनिकांच्या नावे खोट्या बातम्या प्रसारीत करण्याच्या धमक्या दिल्या जातात. त्या दैनिकांचे आर एन आय नंबर उपविभागीय अधिकारी व पोलिसांनी तपासणे आवश्यक आहे. अन्यथा या अधिकाऱ्यांच्या अडचणी वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे. ज्या दैनिकाचे कुठे ही नोंद नाही अशा दैनिकांच्या मार्फत बातम्या प्रसिध्द करण्याच्या धमक्या या खंडणीबाज कथित संपादकांमुळे सर्व यंत्रणा त्रस्त झाली आहे.

## महिलांच्या माध्यमातून खोट्या फिर्यादींचा आरोप

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, काही प्रकरणांत महिलांना पुढे करून खोट्या फिर्यादी दाखल केल्या जातात. कोणी प्रत्युत्तर देण्याचा किंवा अधिकृत तक्रार करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते. संबंधित व्यक्तींची छायाचित्रे प्रसिद्ध करून सामाजिक बदनामी केल्याच्या घटनाही समोर आल्याचे सांगितले जाते. अनेकांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न हा स्वयंघोषित संपादक करत आहे. पैशाच्या मोहातून सुर्यावर राज्य करण्याचे स्वप्न असून अनेक प्लॅट बळकाविण्याचा उद्योग संघटीतपणे करण्याची तयारी त्याने केल्याची माहिती आहे. त्याच्या संपत्तीची चौकशी केल्यास ज्ञात उत्पन्नापेक्षा ती बळकावल्याची अधिक माहिती समोर येत आहे.

## राज्यातील विविध दहा जिल्ह्यातील ठाण्यांत गुन्हे

◆ सदर व्यक्तीविरुद्ध राज्यातील विविध जिल्ह्यांतील पोलिस ठाण्यांत फसवणूक, खंडणी व इतर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर येत आहे. अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या स्वयंघोषित संपादकावर मात्र अद्याप ठोस व कडक कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम व्यक्त केला जात आहे. अकोटमधील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी याप्रकरणी सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, तसेच दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. स्वयंघोषित संपादकाच्या पत्रकारितेच्या नावाखाली सुरू असलेल्या या कथित गैरप्रकारामुळे प्रामाणिक पत्रकारितेलाही धक्का बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, या सर्व आरोपांबाबत संबंधित स्वयंघोषित संपादकाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# राणी सतीधाम मंदिरात आज होळी दहन

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** शहराच्या मध्यवर्ती भागात स्थित राणी सती धाम येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी उत्सवाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले आहे. फाल्गुन शुक्ल पक्ष पौर्णिमेनिमित्त आज, २ मार्च रोजी रात्री ८ वाजता मंदिर परिसरात होळी दहन सोहळा होणार आहे.

यावेळी जळत्या होळीत भक्त प्रल्हादाला मांडीवर घेऊन बसलेल्या होलिकेची नयनरम्य झांकी साकारण्यात येणार असून, हा देखावा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. सकाळपासूनच राजस्थानी समाजातील महिला व युवक-युवतींसह सर्व समाजबांधवांच्या उपस्थितीत होळी दहनपूर्वी भूमिपूजन व कच्ची होळी पूजन विधी पार पडले. राणी सती उत्सव समिती व मंदिर प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून होळी दहन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

◆ चंद्रग्रहणामुळे उद्या मंदिर बंद



## चंद्रग्रहणानिमित्त उद्या मंदिर राहील बंद

◆ दरम्यान, उद्या मंगळवार, ३ मार्च रोजी चंद्रग्रहण असल्यामुळे सूर्योदयापासून सतीधाम मंदिराचे पट दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता श्री राणी सती दादींचे विधिवत स्नान, अभिषेक व पूजा-अर्चना करून महाआरती करण्यात येईल. त्यानंतर भाविकांना दर्शनाचा लाभ घेता येणार असल्याचे मंदिराच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर असल्याचा दावा

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.




गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नांव श्वेता, मी नाईक होमिओपॅथी येथे येण्याअगोदर माझ्या पुर्ण अंगावर सुज होती, उठता बसता येत नव्हते, त्रास व्हायचा, गर्भाशयाच्या पिशवीवर सुज होती. हाडांना कडकपणा होता. परंतु आता नाईक होमिओपॅथाच्या उपचाराने मला छान वाटते आहे. माझी सुज कमी झाली, हाडांचा कडकपणा कमी झाला. नाईक होमिओपॅथीच्या उपचाराने मी पुर्णपणे समाधानी आहे. मी नाईक होमिओपॅथीला धन्यवाद देते.

# जिल्हाधिकारी कार्यालय समोर एक दिवसीय धरणे

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** खडकी बु. परिसरातील सविता गणेश मुंडाले या महिलेला पतीने घरगुती कारणावरून बेदम मारहाण केल्याने पत्नीने टोकाचे पाऊल उचलत राहत्या भाड्याच्या घरात फाशी घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी मृत महिलेचा भाऊ रामेश्वर रामचंद्र मेंगे यांनी पोलीस स्टेशन व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन तक्रार दाखल केली. कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. तक्रारीत भावाने आरोप केला की सविता मुंडाले हिला पती गणेश मुंडाले हा अनेक दिवसापासून शारीरिक व मानसिक त्रास




देऊन दारू पिऊन बेदम मारहाण करत होता. सविताने पतीच्या विरोधात महिला तक्रार निवारण केंद्रात कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार तक्रार दाखल केली होती. परंतु सदर प्रकरण पोलिसांनी समजूत काढल्यानंतर प्रकरण आपसात झाले होते. या नंतरही पतीने त्रास देणे सुरू ठेवले. २१/१२/२०२५ ला रात्री दहा वाजता पती पत्नीचा पुन्हा वाद झाला. या वादात सविताने फाशी घेतल्याचा बनाव पतीने केला. सविताने आत्महत्या केली की तिची हत्या करण्यात आली याची चौकशी करण्याची मागणी सविताच्या भावाने पोलिस अधीक्षक कार्यालयात लेखी पत्र देऊन केली आहे.

# श्री राजेश्वर मंदिरात खग्रास चंद्रग्रहणानिमित्त दर्शन बंद

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** शहराचे आराध्य दैवत असलेल्या श्री राजेश्वर संस्थान, अकोला येथे खग्रास चंद्रग्रहणानिमित्त मंदिराच्या गाभाऱ्याचे दरवाजे काही काळासाठी भाविकांसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानतर्फे देण्यात आली आहे.

मंदिरात दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. होळी व धुलीवंदन सणानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मात्र, मंगळवार, ३ मार्च रोजी खग्रास चंद्रग्रहण असल्यामुळे सकाळी ६.३० वाजल्यापासून सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत मंदिराच्या गाभाऱ्याचे दरवाजे बंद राहणार आहेत. त्यामुळे भाविकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या चंद्रग्रहणाचा कालावधी सकाळी सूर्योदयापासून सुरू होणार असून स्पर्श दुपारी ३.२० वाजता, संमीलन दुपारी ४.३४ वाजता, मध्य सायंकाळी ५.३२ वाजता, उन्मीलन सायंकाळी ५.३५ वाजता तर मोक्ष सायंकाळी ६.४५ वाजता होणार असल्याचे मंदिर परिसरात लावण्यात आलेल्या फलकावर नमूद करण्यात आले आहे. ग्रहण




शुद्धी झाल्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता मंदिराचे पुजारी महेश हरिभाऊ कापडी गुरुजी यांच्या हस्ते अभिषेक व आरती करण्यात येणार आहे. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी दर्शनासाठी खुले करण्यात येईल, अशी माहिती संस्थानतर्फे देण्यात आली आहे.

# माजी मंत्री मखराम पवार यांची 87 वी जयंती साजरी

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** बार्शीटाकळी जवळ असलेल्या लोहगड या निसर्गरम्य मात्र लहानशा गावात जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होण्याचा मान मिळवणारे स्व. मखराम पवार यांची वाटचाल सोपी नव्हती. परंतु परिस्थितीशी दोन हात करीत त्यांनी उच्च स्थान प्राप्त केले. मखराम पवार यांची कर्मभूमी असलेल्या लोहगड गावात त्यांची ८७ वी जयंती आज साजरी करण्यात आली. उपस्थितांनी त्यांच्या पावन स्मृतीला अभिवादन केले. मखराम पवार यांनी जीवनात संघर्ष

◆ लोहगडला जयंती निमित्त भजन कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन



करून समाजासमोर आदर्श ठेवला. उच्च शिक्षणा करिता मुंबई गाठली. मखराम पवार यांनी गरिबीत दिवस काढले. शिक्षण पूर्ण करून दहा वर्ष मुंबई येथे नोकरी केली. नोकरीचा राजीनामा देऊन गोरगरीब बंजारा समाजाला शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. गोरगरिबांची सेवा केली. मखराम पवार हे काही काळ महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री होते. २०२१ साली मुंबई च्या लिलावती रुग्णालयात त्यांनी शेवटचा श्वास घेतला. मखराम पवार यांचा अंत्यविधी लोहगड येथे करण्यात आला. आज त्यांची ८७ वी जयंती लोहगड येथे साजरी करण्यात आली. मोठ्या संख्येने लोक आले होते. जयंतीनिमित्त भजन, कीर्तन आदी कार्यक्रम झाले. आजही ग्रामीण भागातील लोकांच्या मनात मखरामजी पवार जीवंत आहेत याचे दर्शन लोहगड येथे झाले. जयंती कार्यक्रमाला मखराम पवार यांची पत्नी श्रीमती सुमन मखराम पवार, मुले अविनाश मखराम पवार, सतीश मखराम पवार, मोठी सून संध्या अविनाश पवार, लहान सून सारिका सतीश पवार व कटुंबीय उपस्थित होते. पवार कुटुंबाच्या पुढाकाराने जयंती साजरी करण्यात आली.

# समाजात हिंदू भाव जागवणे हाच संमेलनाचा उद्देश : अभिषेक मिश्रा

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** समाजात हिंदू भाव जागवणे हाच हिंदू संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गेली १०० वर्षे हे कार्य करीत आहे. सामाजिक समरसता, पर्यावरण रक्षण, कुटुंब व्यवस्था अशा परिवर्तनातून समाज बलशाली होईल. आणि भारत विश्वगुरूपदी विराजमान होण्याची स्वप्न पूर्ती होईल असा विश्वास रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत टोली सदस्य अभिषेक मिश्रा यांनी केले.

रजपूतपुरा राधेनगर वस्तीचे हिंदू संमेलन बागडे चौकातील हनुमान व्यायाम शाळेजवळ रविवारी रात्री पार पडले. यावेळी मुख्य वक्ता म्हणून ते बोलत होते. संमेलनापूर्वी इस्कॉन टेंपल पासून कलश यात्रा काढण्यात आली. व्यासपीठावर जितेंद्रदास आनंकंद महाराज, अकोला इस्कॉन प्रमुख वैदर्भी चरणदास प्रभुजी, मातृशक्ती जनजागरण अकोला विभाग संयोजिका सरीतादीदी शर्मा होत्या. समिती सदस्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, स्व.




ठाकूर गोपाल सिंह पहेलवान यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. लहान मुलामुलींनी गणेश वंदना, सरस्वती वंदना, पोवाडा सादर केला. समाजात वावरताना कोण जिहादी मानसिकतेचा आहे याचा विचार युवती, महिला यांना करावा लागेल. मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी सावध राहा असे आवाहन सरीतादीदी शर्मा यांनी केले. तर, रा. स्व. संघाच्या शतकपूर्ती निमित्त आयोजित संमेलनातून देशभक्ती आणि सनातन संस्कृतीचे उत्थान होत आहे असे जितेंद्रदास महाराज म्हणाले. कविता जयंत दिगंबर व सोनिया गौतम यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

# कार्डिन कंपनीचा शहरात पहिल्यांदाच डायरेक्ट फॅक्टरी सेल

अकोलेकर ग्राहकांचा सेलला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २ मार्च



**अकोला :** शहरातील सर्व फॅशनप्रेमी महिला आणि पुरुषांमध्ये अमृतवाडीतील ’कार्डिन’ कंपनीच्या ’सर्वात स्वस्त पाच दिवसांच्या सेल’ला ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

जगप्रसिद्ध कार्डिन कंपनीतर्फे आगामी लग्नसराईचा मोसम लक्षात घेता, अकोल्यातील अमृतवाडी येथे एका शानदार ’डायरेक्ट फॅक्टरी सेल’चे आयोजन करण्यात आले आहे. शहरात पहिल्यांदाच ’सर्वात स्वस्त पाच दिवस’ या उपक्रमांतर्गत २५ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत हा सेल फॅशनप्रेमींच्या सेवेत दाखल झाला. फॅशनच्या दुनियेत ’कार्डिन’ कंपनीचे एक वेगळे नाव आहे. विशेषतः तरुणांमध्ये कार्डिन कंपनीच्या ब्रँडेड रेडीमेड कपड्यांची मोठी क्रेझ आहे. या सेलमध्ये सर्व प्रकारच्या कपड्यांची अफाट रेंज एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.






सेलमध्ये पुरुषांसाठी जीन्स पॅंट, टी-शर्ट, फॉर्मल पॅंट, फॉर्मल शर्ट, १००% कॉटन शर्ट आणि स्टायलिश ट्राउझर्स. ’महिलांसाठी कांजीवरम, बनारसी, पैठणी, गडवाल, मंगलागिरी आणि कांचीपट्टू अशा विविध प्रांतांतील नामांकित साड्यांचा समावेश आहे. पुरुषांच्या कपड्यांच्या खरेदीवर आकर्षक ऑफर्स देण्यात येत आहेत. एक खरेदी करा एक मोफत मिळवा, दोन खरेदी करा तीन मोफत मिळवा, तीन खरेदी करा पाच मोफत मिळवा. सेलच्या पहिल्या दिवसापासूनच ग्राहकांची खरेदीसाठी मोठी गर्दी उसळत आहे. इतक्या स्वस्त दरात ब्रँडेड कपडे मिळत असल्याने नागरिक या संधीचा पुरेपूर आनंद घेत आहेत. हा सेल रविवार पर्यंत सुरू होता. स्टॉक संपण्यापूर्वी आपल्या आवडीच्या कपड्यांची खरेदी करण्यासाठी त्वरित भेट द्यावी, असे आवाहन ’कार्डिन सेल’ तर्फे करण्यात आले होते.

# मनपाव्दारा बार्शिटाकली येथील ६२ अवैध नळ जोडण्या खंडित

प्रतिनिधी २ मार्च

**अकोला :** १ मार्चला अकोला शहराला महान येथील शुध्दीकरण केंद्रावारून पाणी पुरवठा करण्यात येते, तसेच महान ते अकोला दरम्यान पाणी पुरवठा करण्यासाठी ७००/६०० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. या मुख्य जलवाहिनीवर बार्शिटाकली येथे काही नागरिकांव्दारे अकोला महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अवैधरित्या ५०, ४०, २५ आणि २० मि.मि.व्यासाची नळ जोडणी करण्यात आली असून यामधून लाखो लीटर पाण्याची चोरी होत असल्याने आज दि. १ मार्च २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मा.पोलीस अधिक्षक श्री अर्चितजी चांडक यांच्या सहकार्याने मनपा पाणी पुरवठा विभागाच्या वतीने पोलीस दलाच्या उपस्थितीत सदर ठिकाणचे एकुण ६२ अवैध नळ जोडणी खंडीत करण्याची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळे, मनपा उपअभियंता नरेश बावणे, शैलेश चोपडे, कनिष्ठ अभियंता संदीप चिमनकर, यांचेसह पोलीस कर्मचारी आणि पाणी पुर्रवठा विभागाचे कर्मचारी आणि फीटर यांचा समावेश होता.

# वाशिम बायपास ते हरिहरपेठ मार्गावर दिवसा ’उजेड’

महापालिका विद्युत विभाग झोपेत आहे का

प्रतिनिधी १ मार्च

**अकोला :** शहराच्या मूलभूत सुविधा आणि प्रशासकीय व्यवस्थापनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाशिम बायपास ते हरिहरपेठ मार्गावरील स्ट्रीट लाईट्सचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. विशेष म्हणजे, दिवसा उजेड असताना येथे वीजेचा अपव्यय केला जात आहे, मात्र रात्रीच्या वेळी जेव्हा नागरिकांना प्रकाशाची नितांत गरज असते, तेव्हा दिवे बंद असतात. शहराच्या विविध भागात रात्री पथदिवे बंद असतात. ते दिसत नाही का अशी विचारणा नागरिक करीत आहेत.



स्थानिक नागरिकांनी तक्रार केली की, वाशिम बायपास परिसरात भरदुपारी स्ट्रीट लाईट्स सुरू असल्याचे पाहायला मिळते. याउलट, सूर्य मावळताच संपूर्ण परिसर अंधाराच्या छायेत हरवून जातो. रात्रीच्या अंधारामुळे या मार्गावर समाजकंटकांचा वावर वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच, रस्ता स्पष्ट दिसत नसल्यामुळे वाहनचालकांसाठी अपघाताचा धोकाही वाढला आहे. एकीकडे प्रशासन वीज बचतीचे आवाहन करते, तर दुसरीकडे दिवसभर दिवे सुरू ठेवून हजारो युनिट वीज वाया घालवली जात आहे. केवळ हाच मार्ग नाही, तर शहरातील इतर अनेक अंतर्गत भागांतही रात्रीच्या वेळी पथदिवे बंद राहण्याची समस्या नित्याची झाली आहे. या समस्येबाबत संबंधित विभागाला वारंवार कळवूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासन एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK